प्रकरण दुसरे

# संबधित संदर्भ साहित्य व संशोधनाचे सिंहावलोकन


२.१ प्रस्तावना

२.२ संबंधित साहित्याचा आढावा

२.३ संबंधित संशोधनाचे सिंहावलोकन

२.४ सर्वसामान्य निष्कर्ष

२.५ प्रस्तुत संशोधनाशी तुलना

ऽप्रकरण दुसरे

# समस्येशी संबंधित संदर्भ साहित्य व संशोधनाचे सिंहावलोकन

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधकाने समस्येशी संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा घेतला आहे.

'पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील संस्थांतर्गत नियोजन आणि प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास' या संशोधन कार्यासाठी संबंधित संदर्भ साहित्य व संशोधनाचा अभ्यास केला. या अभ्यासातून प्राप्त झालेल्या माहितीची मांडणी पुढीलप्रमाणे केली आहे.

आजपर्यंत बऱ्याच संशोधकांनी कनिष्ठ महाविद्यालयीन शैक्षणिक परिस्थिती शैक्षणिक समस्या, नियोजन, प्रशासन, पर्यवेक्षण, तपासणी इत्यादी संदर्भात संशोधन केलेले आढळून आले. परंतु संस्थांतर्गत नियोजन आणि प्रशासनाचा स्वतंत्रपणे कोणी विचार केला नाही.

प्रस्तुत संशोधनकार्य हे कनिष्ठ महाविद्यालयीन संस्थांतर्गत नियोजन आणि प्रशासन या वर्गात येते. प्रत्यक्ष संशोधनकार्य करताना संशोधकाने पुढील गोष्टींचा आढावा घेतला आहे.

१) प्रस्तुत विषयावर यापूर्वी अन्य कोणी संशोधन केले आहे काय ?

२) संशोधन केले असल्यास ते कोणत्या प्रकारचे आहे ?

३) त्या संशोधनाची उद्दिष्टे कोणती होती ?

४) त्यांनी संशोधनकार्यासाठी कोणत्या संशोधन पद्धतीचा वापर केला ?

५) संशोधन कार्यातून कोणते निष्कर्ष काढले ?

इत्यादी गोष्टीची माहिती मिळवण्यासाठी विविध ग्रंथाचा वापर केला. त्या ग्रंथाचा अभ्यास केल्यानंतर शेवटी असे आढळून आले की कनिष्ठ महाविद्यालयातील संस्थांतर्गत नियोजन आणि प्रशासनावरती स्वतंत्रपणे अभ्यास झालेला नाही. या संशोधनासंदर्भात काही संदर्भ साहित्य व संशोधन साहित्याचे सिंहावलोकन पुढीलप्रमाणे केलेले आहे.

## २.१.) संबंधित साहित्याचा आढावा –

प्रस्तुत संशोधन कार्याच्या पूर्ततेसाठी अनेक वेगवेगळ्या संदर्भ साहित्याचा आढावा घेतला आहे. त्याविषयी थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे –

**शिक्षण आणि 'समाज' (जुलै – सप्टेंबर १९९०)**

शिक्षण आणि समाज या मासिकामधून 'चीनमधील प्राथमिक शिक्षणाचे नियोजन आणि प्रशासन' या शीर्षकाखाली संपादकीय लेख आला होता. या संपादकीय लेखाचा अभ्यास केला असता नियोजन आणि प्रशासन याचा परस्पर संबंध समजण्यास मदत झाली. तसेच या संपादकीय लेखामध्ये नियोजन कसे करावे, केव्हा करावे व कोणी करावे याविषयी माहिती दिलेली आहे.

या लेखामध्ये प्राथमिक शिक्षणासंदर्भातील सद्याचे नियोजन व त्याद्वारे केले जाणारे प्रशासन याचा विचार केला आहे. तसेच प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी कशा प्रकारे नियोजन करावे व त्याद्वारे प्रशासन कसे असावे याविषयी माहिती दिलेली आहे.

**शिक्षण आणि समाज (ऑक्टोबर – डिसेंबर १९८६)**

वरील संदर्भीय मासिकातील पृष्ठ क्रमांक ५१ वर अ.वि. गाडगीळ यांचा 'प्रशासन पद्धती आणि आर्थिक व्यवस्थापन' या शीर्षकाखाली प्रशासनाच्या विविध पद्धतींची माहिती दिलेली आहे. वेगवेगळ्या प्रशासन पद्धतींचा वापर कसा केला जावा याविषयी विचार मांडले आहेत.

तसेच आर्थिक व्यवस्थापन कसे करावे व यासाठी प्रशासन पद्धतीचा वापर करताना कोणता विचार करावा याची माहिती दिलेली आहे. आर्थिक जबाबदाऱ्यांची जाणीव होणे आवश्यक आहे असे म्हटले आहे.

## २.३) संबंधित संशोधनांचे सिंहावलोकन -

संशोधकाने आपल्या संशोधन कार्याशी संबंधीत ज्या - ज्या संशोधनांचा आढावा घेतला ते खालीलप्रमाणे आहेत. त्या संशोधन अहवालांची उद्दिष्टे, कार्यपद्धती व निष्कर्ष हे संक्षिप्त रुपाने पुढीलप्रमाणे -

**कोटीकेला डी.सी. (१९८५)**

बेळगांव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास.
(एम.फिल. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

**संशोधनाची उद्दिष्टे -**

१) बेळगाव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांची सर्वमान्य माहिती जाणून घेणे.

२) बेळगाव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील सद्य स्थितीतील शैक्षणिक प्रशासनाचा अभ्यास करणे.

३) कनिष्ठ महाविद्यालयातील वेळापत्रक अभ्यासक्रम अध्यापन पद्धती, अध्यापनाचे माध्यम, ग्रंथालय सुविधा, पाठ्यपुस्तके, प्रयोगशाळा सुविधा व परीक्षा याबाबत येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी सुधारणा सुचविणे.

**संशोधन साधने -**

संशोधकाने बेळगाव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांसाठी प्रश्नावली व मुलाखतीसाठी प्रश्न सूची तयार केली. संशोधकाने या साधनांद्वारे माहिती गोळा केली. बेळगाव शहरातील ७ कनिष्ठ महाविद्यालयाची निवड करुन शिक्षकांना दैनंदिन कामकाजाबाबत प्रश्न विचारले. व स्वत: शिक्षकांना प्रश्नावली देवून भरुन घेतली.

**संशोधन पद्धती -**

संशोधकाने प्रस्तुत संशोधन कार्यासाठी सर्वेक्षण पद्धती वापरली. संशोधकाने बेळगाव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांची निवड करुन त्यातील ८५ शिक्षकांची संशोधन कार्यासाठी माहिती मिळवण्यासाठी निवड केली. कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जाणवणाऱ्या समस्यांवर

आधारीत प्रश्नावली तयार केली व माहिती मिळवली. संशोधकाने प्रत्यक्षपणे जावून त्या कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी देवून तेथील सुविधांचे निरीक्षण केले. संशोधनाद्वारे माहिती गोळा केली. संशोधकाने निरीक्षणाद्वारे भौतिक सुविधांची पाहणी केली. त्यामध्ये वर्गखोल्या, इमारत, ग्रंथालय सुविधा, क्रिडा सुविधा इत्यादीची पाहणी केली.

**निष्कर्ष –**

१) बेळगाव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक पदव्युत्तर पदवीधारक आहेत.

२) बेळगाव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी पुस्तकाची कमतरता आढली नाही.

३) कनिष्ठ महाविद्यालयातील वेळापत्रक योग्य पद्धतीने तयार केलेले आहे.

४) कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक प्रामुख्याने व्याख्यान पद्धतीचा अवलंब करतात.

**मोरे.एस्.एस. (२००२)**

'दुबार पद्धतीने भरणाऱ्या माध्यमिक शाळांच्या प्रशासनात येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास.' पीएच.डी. पदवी प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१) दुबार पद्धतीने भरणाऱ्या माध्यमिक शाळांच्या समस्यांचा शोध घेणे.

२) दोन्ही सत्रामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना समन्वय साधण्यामध्ये येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

३) दुबार पद्धतीने भरणाऱ्या माध्यमिक शाळांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची साधने –**

संशोधनासाठी आवश्यक असणारी सामग्री गोळा करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती भेटी व निरीक्षण इत्यादीची साधनांचा अवलंब करण्यात आला. संशोधकाचे मुख्य साधन म्हणून

संशोधकाने प्रश्नावली या साधनाचा वापर केला व पूरक माहिती मिळवण्यासाठी मुलाखत व निरीक्षण या तंत्रांचा वापर केला.

**कार्यपद्धती –**

संशोधकाने संशोधन कार्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला. प्रश्नावलीद्वारे मुख्याध्यापकांना वेगवेगळ्या घटकांवर आधारीत १११ प्रश्न विचारले यामध्ये शाळेसंबंधी, प्रशासनासंबंधी कार्यालयासंबंधी, विद्यार्थ्यांसंबंधी, शिक्षकांसंबंधी, इमारतविषयक स्वच्छतागृहाविषयी, सहशालेय कार्यक्रमासंबंधी, परीक्षेसंबंधी घटकांचा समावेश होता.

उपमुख्याध्यपक, पर्यवेक्षक व शिक्षकांकडून मुलाखतीद्वारे माहिती गोळा केली. तसेच गटशिक्षण अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याकडून ही मुलाखतीद्वारे माहिती मिळवली.
प्रथम संशोधकाने दुबार पद्धतीने भरणाऱ्या माध्यमिक शाळांच्या मान्यते संदर्भात माध्यमिक शाळा संहितेचा अभ्यास केला.

त्यानंतर आराखडा तयार करून माहिती गोळा करण्यासाठी दुबार पद्धतीने भरविल्या जाणाऱ्या शाळांची निवड केली. प्रश्नावल्या देवून, संबंधीतांच्या मुलाखती घेवून माहिती गोळा केली. व त्यामाहितीवर संख्याशास्त्रीय प्रक्रिया केली.

२) **निष्कर्ष –**

१) ५० टक्के दुबार पद्धतीने भरणाऱ्या शाळांमध्ये स्वतंत्र शिक्षक व कार्यालयासाठी स्वतंत्र खोली होती.

२) दुबार पद्धतीने भरणाऱ्या ४० टक्के शाळांमध्ये स्वतंत्र ग्रंथालय होते.

३) दुबार पद्धतीने भरणाऱ्या ७० टक्के माध्यमिक शाळांमध्ये पुरेशा वर्गखोल्या मोठ्या नव्हत्या.

**मुळे. एन.बी (२००१)**

'सोलापूर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन आणि प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.' पीएच.डी. पदवी प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१) सोलापूर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयांतील शैक्षणिक नियोजनाचे सर्वेक्षण करणे.

२) सोलापूर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक प्रशासनाचे सर्वेक्षण करणे.

**संशोधन साधने –**

संशोधकाने आपल्या संशोधन कार्याची माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत, प्रत्यक्ष भेटी व निरीक्षण इत्यादी साधनांचा वापर केला आहे.

**कार्यवाही –**

संशोधकाने कनिष्ठ महाविद्यालयांशी संबंधीत संदर्भ साहित्य व शासकीय परिपत्रके याचा अभ्यास करुन संशोधनाचा आराखडा तयार केला. कनिष्ठ महाविद्यायांच्या प्राचार्याकडून प्रश्नावली देवून माहिती गोळा केली तसेच उपप्राचार्य, पर्यवेक्षक व शिक्षकांच्याकडून मुलाखतीद्वारे माहिती गोळा केली. तसेच शासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेण्यासाठी प्रथम प्रश्नसूची तयार केली व त्याद्वारे माहिती गोळा केली.

अशाप्रकारे प्रश्नावलीद्वारे ११ प्राचार्याकडून २५० शिक्षकांच्या व ६० शासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेवून माहिती गोळा केली. यातून मिळालेल्या माहितीच्या विश्लेषणासाठी संख्याशास्त्रीय 'शतमान' पद्धतीचा अवलंब केला.

**निष्कर्ष –**

१) सोलापूर जिल्ह्यातील एकही कनिष्ठ महाविद्यालय स्वतंत्र नाही.

२) वर्षाआरंभीच नियोजन करणाऱ्या प्राचार्यांचे प्रमाण ९८.२१ % आहे.

३) नियोजनानुसार कार्यवाही करणारे ९४.६४ %

४) प्रशासनात ७६.७८ % प्राचार्यांना अडचणी येत नाहीत.

मिश्रा रामकिशोर (१९८३)

'फैजाबाद विभागातील ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.'

" A critical study of administration of Secondary education in rural areas of faizabad division," Ph.D. edu. Avadh university - (M.B. Buch 3rd Survey, page -913)

**उद्दिष्टे –**

१) 'सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या फैजाबाद विभागातील माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

२) शासनाची भूमिका, तिचे नियंत्रण आणि पर्यवेक्षण माध्यमे, या विभागातील ग्रामीण माध्यमिक शिक्षणांसंबंधीत व्यवस्थापणाचे प्रशासन याचे संशोधन.

३) शिक्षक व मुख्याध्यापक संबंधित प्रशासकीय भूमिकांचा अभ्यास करणे.

**कार्यपद्धती –**

प्रस्तुत संशोधन कार्य हे सर्वेक्षण पद्धतीने केले आहे. यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी नमूना म्हणून सात जिल्ह्यांचे शाळा निरीक्षक, २५८ प्राचार्य, २२० शिक्षक, २२२ विद्यार्थी यांची निवड केली होती. यांच्याकडून माहिती गोळा करण्यासाठी ४ प्रश्नावल्या तयार केल्या होत्या. गोळा केलेल्या माहितीवरुन सारणीकरण व पृथ:क्करण करुन संख्याशास्त्रीय साधनाचा वापर करून शेकडेवारी काढली.

**निष्कर्ष –**

१) ३/४ पेक्षा जास्त प्राचार्य हे शैक्षणिक प्रशासन हे शासन अनुकूल असावे या मताचे होते.

२) प्रशासनात प्राचार्यांचे अधिकार अपुरे आढळले.

**पांडा एस.एन. (१९७९)**

'मुख्याध्यापक व मुख्याध्यापकाशी संबंधीत त्या पार्श्वभूवरील विविध घटकांचे प्रशासकीय वर्तन पाहणे.'

(M.B. Buch (edi) second survey of Resarch in education Baroda, Ceuter of Advanced studies in Education - Page - No. 284)

**संशोधनाचे उद्दिष्टे -**

१) व्यवहारामध्ये मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन आदर्श प्रशासकीय वर्तनानुसार आहे काय याचा शोध घेणे.

२) संस्था व शाळेचा दर्जा व परिणामकारकता यासंबंधी आदर्श व वास्तव प्रशासकीय वर्तन यामधील संबंधाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३) प्रशासकीय वर्तनामागील कार्यरत घटक कोणते आहेत याचा शोध घेणे.

**साधने -**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली तयार केली व ती प्रश्नावली प्रतिसादकांकडून भरून घेतली. तसेच मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन करण्यासाठी संख्याशास्त्रीय साधन म्हणून 'काय स्क्वेअर' चाचणीचा उपयोग केला.

**कार्यपद्धती -**

प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधकाने एकंदरीत १६८ शाळांमधील २००० शिक्षकांचा अभ्यास केला. यासाठी राजस्थानातील काही निवडक शाळा घेतल्या व त्यासाठी स्तरीय नमुना निवड तंत्राचा वापर केला. तसेच माध्यमिक ग्रामीण विरुद्ध माध्यमिक शहरी मुले व मुले विरुद्ध मुली या प्रकारचा पाया गृहित धरला. प्रतिसादकांकडून प्राप्त माहितीचे विश्लेशषण व अर्थनिर्वचन करुन निष्कर्ष काढले. विश्लेषणासाठी 'काय स्क्वेअर' या संख्याशास्त्रीय चाचणीचा उपयोग केला.

**निष्कर्ष –**

प्रशासकीय वर्तनाबाबत मुख्याध्यापक जास्तीत जास्त आत्मकेंद्री, अधिकारवादी, स्त्रीवादी आणि दळणवळणाबाबत कमी परिणामकारक, कमी सहकार्यशील, दुसऱ्यांबद्दल आदरभाव असणारे होते.

**गोगटे श्री. ब. व. पाध्ये म.द. (१९८०)**

'मराठवाड्यातील कनिष्ठ महाविद्यालयांचा चिकित्सक अभ्यास.' – एम.फील. पुणे.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१) मराठवाड्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयाचे, प्रयोगशाळा, अध्यापक वर्ग, विद्यार्थी समस्या, शैक्षणिक साधने, अर्थ व्यवस्था व परीक्षेचे निकाल इत्यादीचा अभ्यास करणे.

२) मराठवाड्यातील परीक्षेचे काळात जे गैरप्रकार चालतात त्या कारणांचा अभ्यास करणे.

३) मराठवाड्यातील इयत्ता १२ वी च्या वर्गाच्या निकालाचा अभ्यास करणे.

**संशोधन साधने –**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने साधन म्हणून प्रश्नावलीचा वापर केला. प्रश्नावलीद्वारे मराठवाड्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील संस्था चालक, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी व पालक इत्यादींकडून माहिती गोळा केली. काही कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी देवून निरीक्षणे केली. तसेच मुलाखतीद्वारे प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी यांच्याकडून माहिती मिळवली.

**संशोधन कार्यपद्धती –**

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला. सर्वेक्षण पद्धतीद्वारे मराठवाड्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी यांच्याकडून माहिती गोळा केली. काही कनिष्ठ महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देवून निरीक्षणे केली. प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या मुलाखती घेतल्या.

**निष्कर्ष –**

१) मराठवाड्यातील माध्यमिक शाळांशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयाच्या तुलनेत फारच कमी आहे.

२) कनिष्ठ महाविद्यालयात ५० टक्के विद्यार्थी इयत्ता दहावीच्या परीक्षेत ६० % पेक्षा कमी गुण मिळालेले होते.

३) कनिष्ठ महाविद्यालयात ग्रंथालय सुविधा, प्रयोगशाळा सुविधा क्रिडासाहित्य यांचा अभाव जाणवला.

४) परीक्षेतील गैरप्रकाराबाबत कडक कारवाई व्हावी ही प्राचार्यांची अपेक्षा आहे.

५) मराठवाड्यातील कनिष्ठ महाविद्यालयांना शैक्षणिक वातावरण अनुकूल नाही.

**जी.सी. पी. आय. (१९८१)**

'अलाहाबाद येथील शासकीय उच्च माध्यमिक शाळांतील ग्रंथालय व वाचनालयाच्या स्थितीचा अभ्यास.'

(M.B. Buch (Edi) Third Survey of Research in education New Delhi, N.C.E.R.T, (1978-83) page - No. 889.)

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१) उत्तर प्रदेशातील सरकारी उच्च माध्यमिक शाळेतील ग्रंथालयाच्या सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.

२) या ग्रंथालयातील असमाधानकारक स्थितीला जबाबदार विविध घटकांचा शोध घेणे.

३) सरकारी उच्च माध्यमिक शाळेतील ग्रंथालयाच्या सद्यस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणणे.

**संशोधनाची साधने –**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्राचार्य व विद्यार्थ्यांकडून माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली या संशोधनसाधनाचा वापर केला. व या प्रश्नावली द्वारे प्राचार्य व विद्यार्थ्यांकडून आवश्यक माहिती मिळविली.

**संशोधन कार्यपद्धती –**

प्रस्तुत संशोधनकार्यासाठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. शासकीय उच्च माध्यमिक शाळांच्या प्राचार्यांना व विद्यार्थ्यांना प्रश्नावली देवून माहिती संकलित केली. प्राप्त माहितीचे संख्याशास्त्रीय साधन वापरुन विश्लेषण केले. या प्रस्तुत संशोधन कार्यासाठी १० प्राचार्य व १० उच्च माध्यमिक शाळेतील प्रत्येकी १० विद्यार्थी यांच्याकडून माहिती गोळा केली.

**निष्कर्ष –**

१) शासकीय, उच्च माध्यमिक शाळांतील ग्रंथालयाची अवस्था समाधानकारक नव्हती, इमारत अपुरी होती, दुबार पद्धतीच्या शाळा सोडून इतर ठिकाणी स्वतंत्र वाचनालयाची सुविधा नव्हती. तेथे प्रशिक्षित व पूर्णवेळ ग्रंथपाल नव्हते.

२) ग्रंथालय सेवा नियमित उपलब्ध नव्हती.

**गोगटे एस.बी. (१९७९)**

'महाराष्ट्रातील १९७६–७७ या शैक्षणिक वर्षातील कनिष्ठ महाविद्यालयीन द्वितीय वर्षातील सद्य:परिस्थितीचा चिकित्सक अभ्यास.' (पीएच.डी. पुणे विद्यापीठ)

(M.B. Buch (Edi) Thired survery of Research in Ectucation)

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१) कनिष्ठ महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षातील परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) कनिष्ठ महाविद्यालयातील अडचणींचा शोध घेणे.

३) कनिष्ठ महाविद्यालयात निर्माण होणाऱ्या अडचणीवर उपाय सुचविणे.

४) नव्या आकृतीबंधातील उच्च माध्यमिक स्तराचा अभ्यास करणे.

**संशोधनाची साधने –**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने साधन म्हणून प्रश्नावली, मुलाखत, चर्चा, बुद्धीमापन कसोट्या इत्यादी साधनांचा वापर केला आहे.

**संशोधनाची कार्यपद्धती –**

संशोधकाने संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला. पुणे जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालय, प्रयोगशाळा, शैक्षणिक साधने, अभ्यासेतर कार्यक्रम, इमारत इत्यादीबाबत अभ्यास केला. महाराष्ट्रातील नव्या उच्च माध्यमिक या शैक्षणिक आकृतीबंधाचा शेजारील गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, गोवा या राज्यातील सदर स्तरांशी तुलनात्मक अभ्यास केला.

**निष्कर्ष –**

१) शहरी भागातील कनिष्ठ महाविद्यालयांना व शाळांना ग्रामीण भागापेक्षा चांगले शैक्षणिक वातावरण लाभले.

२) माध्यमिक शाळांशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयापेक्षा वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयात ग्रंथालय, प्रयोगशाळा, अभ्यासेतर कार्यक्रम, शैक्षणिक साधने इत्यादी सुविधा अधिक प्रमाणात उपलब्ध आहेत.

## जोशी पी. एम्. (१९८०)

'राजकोट शहरातील उच्च माध्यमिक शाळांतील संघटित वातावरणाचा शोध घेणे.'

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१) राजकोट शहरातील उच्च माध्यमिक शाळांच्या संदर्भात हेल्पीन आणि क्रॉप्टस्‌च्या अभ्यासाचे पुनरावलोकन करणे.

२) प्रत्येक शाळांसाठी आराखडा तयार करणे.

३) विविध प्रकारच्या शाळांच्या वातावरणाची तुलना करणे.

४) शाळेचा आकार, व्यवस्थापन स्थान आणि त्यातील अभ्यासक्रम यांचा संघटित वातावरणासह विविध शाळांमधून लिंगभेदानुसार अभ्यास करणे

**संशोधनाची साधने -**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत या साधनांचा वापर केला आहे.

**संशोधनाची कार्यपद्धती –**

संशोधकाने या अभ्यासासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला. याकरिता तुलाखत घेऊन त्यांच्या प्रशासकीय अभिलेखांचे निरीक्षण करुन माहिती संकलित करण्यात आली. प्राप्त माहितीवरुन विभागनिहाय विश्लेषण केले. शिक्षणाधिकाऱ्याला विस्तारीत प्रश्नावली देऊन माहिती संकलित केली व प्राप्त माहितीचे विश्लेषण केले.

**निष्कर्ष -**

१) हेल्पीन व क्रॉप्टस यांच्या संशोधनातून प्राप्त संघटित वातावरणाचे सर्व गट सर्व शाळांमध्ये उपलब्ध होते.

२) बंदिस्त वातावरणात असलेल्या शाळांची संख्या जास्त होती.

३) विविध आकार व स्थान आणि त्यातील अभ्यासक्रम यांचा विचार करताना त्या शाळांध्ये कोणताही फरक दिसून आला नाही.

**देशमुख पी.ए. (१९८९)**

'अहमदनगर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयांना उपलब्ध अनुदानाचा विनियोग करताना प्रशासक या नात्याने प्राचार्यांना येणाऱ्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास.' एम.फील. पदवी, पुणे.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१) प्राचार्यांना प्रशासन, विद्यार्थी संख्या, इमारत, फर्निचर, ग्रंथालय, शैक्षणिक साधने, प्रयोगशाळा साहित्य, क्रिडा साहित्य अभ्यासेत्तर कार्यक्रम या घटकावर अनुदानाची रक्कम खर्च करताना येणाऱ्या अडचणींची नोंद घेणे.

२) ज्या घटकासाठी अनुदान दिले जाते त्यासाठी वापर होतो का नाही ते पाहणे.

३) वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांचा तुलनात्मक अभ्यास करणे

**संशोधन साधने –**

प्रस्तुत संशोधक कार्यासाठी माहिती संकलन करण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर केला. प्राचार्यांकडून प्रश्नावल्या भरुन घेतल्या. या प्रश्नावलीमध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील प्रशासन, वर्गसंख्या, प्रयोगशाळा, फर्निचर ग्रंथालय इ. घटकावर अनुदान खर्च करताना येणाऱ्या अडचणीवर प्रश्न विचारले.

**कार्यपद्धती –**

संशोधकाने संशोधन कार्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला. प्राचार्य हे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुख प्रशासक असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती गोळा केली. अहमदनगर जिल्ह्यातील अनुदान मिळणारी कनिष्ठ महाविद्यालये निवडली. अहमदनगर जिल्ह्यात माध्यमिक शाळा, संलग्न कनिष्ठ महाविद्यालये ५८ आहेत. वरिष्ठाशी संलग्न १८ आहेत. या सर्व ७६ कनिष्ठ महाविद्यालयांची निवड केली.

**निष्कर्ष –**

१) अहमदनगर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांना प्रचलित नियमाप्रमाणे उपलब्ध सेवक वर्गाच्या साहाय्याने प्रशासकीय कामकाज पार पाडणे कठिण जाते.

२) कनिष्ठ महाविद्यालयासाठी वर्गखोल्या अपुऱ्या असल्यामुळे अडचण निर्माण होते.

३) कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी संख्या जास्त असल्याने ग्रंथालय, क्रिडासाहित्य, प्रयोगशाळा साहित्य, शैक्षणिक साधने यांचा वापर प्रमाणानुसार होऊ शकत नाही.

**सर्वसामान्य निष्कर्ष –**

१) कनिष्ठ महाविद्यालयाच्या संदर्भात पहिल्या संशोधनात बेळगाव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयाचा चिकित्सक अभ्यास केला आहे. बेळगाव शहरातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक हे पदव्युत्तर पदवीधारक आहेत. हे पदवीधारक शिक्षक अध्यापनामध्ये प्रामुख्याने व्याख्यान पद्धतीचा वापर करतात. विद्यार्थ्यांसाठी पुस्तकांची संख्याही कमी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक ती पुस्तके मिळत नाहीत.

२) दुसऱ्या संशोधन साहित्यामध्ये दुबार पद्धतीने भरणाऱ्या शाळांमध्ये शिक्षक व कार्यालयासाठी स्वतंत्रपणे खोल्या होत्या. शिवाय ४० % शाळांमध्ये स्वतंत्र ग्रंथालय होते. आणि ७० % माध्यमिक शाळांमध्ये वर्गखोल्या या मोठ्या नव्हत्या.

३) तिसऱ्या संशोधन अहवालावरुन निघालेले सर्वसामान्य निष्कर्ष असे सांगतात की सोलापूर जिल्ह्यात एक ही स्वतंत्रपणे कनिष्ठ महाविद्यालय नाही. कनिष्ठ महाविद्यालयाच्या कामकाजासंबंधी वर्षारंभीच नियोजन करणारे प्राचार्य हे ९८.२१ % होते. आणि त्या नियोजनानुसार कार्यवाही करणारे ९४.६४ % प्राचार्य होते. शिवाय ७६.७८ % प्राचार्यांना प्रशासनात अडचणी येत नाहीत.

चौथ्या संशोधन अहवालाच्या आढाव्यावरुन असे लक्षात येते की, शैक्षणिक प्रशासन हे शासन अनुकूल असावे पण प्राचार्यांचे प्रशासनासंदर्भात असणारे अधिकार हे अपुरे आहेत.

पाचव्या संशोधन अहवालाच्या अभ्यासावरून पुढील निष्कर्ष लक्षात आला की, प्रशासकीय वर्तनाबाबत मुख्याध्यापक जास्तीत जास्त आत्मकेंद्री, अधिकारवादी, स्त्रीवादी आणि दळणवळणाबाबत कमी परिणामकारक, कमी सहकार्यशील, दुसऱ्याबद्दल आदरभाव असणारे होते.

सहाव्या संशोधन अहवालातून पुढील निष्कर्ष निघतो. माध्यमिक शाळेशी संलग्न असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची संख्या ही वरिष्ठ संलग्न असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी संख्येच्या मानाने कमी आहे. महाविद्यालयात ग्रंथालय सुविधा, प्रयोगशाळा, क्रिडा साहित्याचा अभाव होता. व मराठवाड्यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयांना शैक्षणिक वातावरण अनुकुल नाही.

सातव्या अहवालामधून आलेले निष्कर्ष, शासकीय उच्च माध्यमिक शाळांतील ग्रंथालयाची अवस्था समाधानकारक नव्हती. इमारत अपुरी होती, दुबार पद्धतीच्या शाळा सोडून इतर ठिकाणी वाचनालयाची सोय नव्हती. व प्रशिक्षित व पूर्णवेळ ग्रंथपालही नव्हते.

आठव्या संशोधन अहवालामध्ये पुणे जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालय प्रयोगशाळा, शैक्षणिक साधने, अभ्यासोत्तर कार्यक्रम, इमारत इत्यादीबाबत अभ्यास केला. त्यातून मिळालेल्या माहितीवरून शहरी भागातील कनिष्ठ महाविद्यालयांना व शाळांना ग्रामीण भागापेक्षा चांगले शैक्षणिक वातावरण आहे. माध्यमिकशी संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयापेक्षा वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ग्रंथालय, प्रयोगशाळा, अभ्यासेत्तर कार्यक्रम, शैक्षणिक साधने इत्यादी सुविधा अधिक प्रमाणात उपलब्ध आहेत.

नवव्या संशोधन अहवालानुसार बंदिस्त वातावरणामध्ये जास्तीत जास्त शाळा होत्या. शिवाय विविध आकार, स्थान आणि त्यातील अभ्यासक्रम यांचा विचार करता संबंधित शाळांमध्ये काहीच फरक नव्हता.

दहाव्या अहवालानुसार अहमदनगर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांना प्रचलित नियमाप्रमाणे सेवकवर्गाच्या साहाय्याने कामकाज पार पाडणे कठिण जाते. वर्गखोल्या अपुऱ्या असल्यामुळे अडचण निर्माण होते. व ग्रंथालय, क्रीडासाहित्य, प्रयोगशाळा साहित्य यांचा वापर प्रमाणानुसार होत नाही.

## २.४) प्रस्तुत संशोधनाशी तुलना –

वरील संशोधन संदर्भ साहित्याचा व संशोधन ग्रंथाचा आढावा घेतल्यामुळे संशोधकाला कोणकोणत्या विषशयावर संशोधन झाले आहे तसेच त्या संशोधन कार्यातून कोणत्या गोष्टीवर प्रकाश टाकला आहे हे समजले. त्याचबरोबर त्यांनी संशोधन कार्यासाठी वापरलेली संशोधन कार्यपद्धतीही समजण्यास मदत झाली.

वरील सर्व संशोधन कार्ये ही २००२पूर्वी झालेली आहेत तसेच या संशोधन कार्याचा आढावा घेताना कनिष्ठ महाविद्यालयातील संस्थांतर्गत नियोजन आणि प्रशासनाचा स्वतंत्रपणे कोणीही अभ्यास केला नसल्याचे आढळले. शिवाय प्रस्तुत संशोधनाचा व झालेल्या संशोधन कार्याचा कालावधी, क्षेत्र, स्तर हा वेगवगेळा आहे.

आजच्या काळात शिक्षण प्रक्रियेमध्ये अद्ययावत नवनवीन अशा तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. शिवाय यासदंर्भात प्राचार्यांनी याच्या वापरासाठी नियोजन आणि प्रशासन कसे करावे, उपलब्ध मनुष्यबळाचा वापर कसा करावा याविषयी शिक्षण खात्याकडून ८ प्राचार्यांना मार्गदर्शन मिळते. पण त्याचा वापर प्रत्यक्षपणे संस्थांतर्गत नियोजन आणि प्रशासनासाठी प्राचार्य कशा पद्धतीने करतात याविषयीची माहिती मिळवण्यासाठी प्रस्तुत संशोधनकार्य केले आहे.

## २.५) समारोप –

प्रकरण दोन मध्ये संशोधकाने संशोधन कार्य करत असताना अभ्यासलेली संदर्भ पुस्तके संदर्भ ग्रंथ तसेच मासिके याविषयीचा आढावा घेतला आहे. तसेच प्रस्तुत संशोधनाच्या समस्येला अनुसरुन आजपर्यंत झालेल्या संशोधन कार्याच्या अहवालाचाही अभ्यास केला आहे. ज्या – ज्या संशोधन अहवालाचा अभ्यास केला व त्यातून मिळालेल्या माहितीचा आढावा या प्रकरणात घेतलेला आहे.

यापुढील प्रकरण तीनमध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील संस्थांतर्गत नियोजन आणि प्रशासन व त्यामध्ये येणाऱ्या मुख्य घटकांविषयी विवेचन करण्यात आले आहे.